|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डिसेंबर-२०२५ तसेच एप्रिल/मे/जून-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने ३५ व्या दीक्षांत समारंभाची तयारी सुरू केली असून, पदवी व पदविका प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेशावेळी किंवा परीक्षा अर्जासोबत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क भरलेले नसलेल्या तसेच नुकतीच पीएच.डी. पदवी घोषित झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांना आयोजित करण्यात येणाऱ्या ३५ व्या दीक्षांत समारंभात पदवी व पदविका प्रदान करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या http://www.nmu.ac.in या संकेतस्थळावरील Student Corner → Convocation → 35th Convocation Ceremony या लिंकवर जाऊन आवश्यक माहिती भरून अर्ज करावा.

विद्यापीठाने अर्जासाठी कालावधीही जाहीर केला असून, विलंब शुल्काशिवाय ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत ३ ऑगस्ट २०२६ ते १५ ऑक्टोबर २०२६ अशी आहे. तर विलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत १६ ऑक्टोबर २०२६ ते १५ नोव्हेंबर २०२६ असून, यासाठी विहित शुल्कासोबत ₹५०० विलंब शुल्क भरावे लागणार आहे. दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी डिसेंबर-२०२५ किंवा एप्रिल/मे-२०२६ परीक्षेच्या अर्जासोबतच पदवी प्रमाणपत्राचे शुल्क भरले आहे, अशा विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

पदवी प्रमाणपत्र शुल्काबाबतही विद्यापीठाने माहिती दिली असून, उत्तीर्ण झाल्यापासून पाच वर्षांच्या आत अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क ₹५५०, तर पाच वर्षांनंतर अर्ज करणाऱ्यांसाठी शुल्क ₹१,४३० निश्चित करण्यात आले आहे. शुल्काचा भरणा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंग किंवा यूपीआयद्वारे ऑनलाइन करावा लागणार आहे.

विद्यार्थ्यांनी अर्ज करताना सर्व सूचना काळजीपूर्वक पाळाव्यात. अर्जामध्ये अपूर्ण किंवा चुकीची माहिती आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल आणि भरलेले शुल्क परत मिळणार नाही, असेही विद्यापीठाने नमूद केले आहे. ३५ व्या दीक्षांत समारंभासंदर्भातील पुढील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

.......................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता